सं. फौ. ख. क्र. **<u>११३६/२०२३</u>**
विजय विरूद्ध अनिल
**निशाणी २२ खाली**

**<u>फिर्यादी पक्षातर्फे साक्षीदार क्र. १ विजय संतोष श्रावगी याची उलतपासणी शपथेवर सुरू</u> — <u>आरोपीतर्फे ॲड. श्री. एन. सी. वाघ यांचे मार्फत</u> —**

आरोपीचे व माझे सन २०२० पासुन संबंध आहेत. आरोपीशी माझे संबंध माझा साळा रूपेश टिबडेवाल याच्यामार्फत आले होते. माझा कपाशीचा भागीदारीचा व्यवसाय आहे. माझा सदरचा व्यवसाय १९९७ साल पासुन आहे. माझे वडिल सदर व्यवसाय करत होते व मी सन २०१० साला पासुन त्यांना जुडलो आहे. माझ्याकडे कपाशीच्या व्यवसायाचा परवाना आहे. सदर परवाना मी दाखल केलेला नाही. सदर परवाना दाखल न करण्याचे कारण असे की, सदर परवाना भागीदारीचा आहे. माझी भागीदारी अग्रवाल यांच्यासोबत होती. मागील दोन वर्षांपासुन भागीदारी तुटली आहे. मी आयकर विवरण पत्र भरत होतो. मी सदर प्रकरणात माझे आयकर विवरण पत्र दाखल केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, मला आवश्यकता न वाटल्यामुळे मी माझे आयकर विवरण पत्र दाखल केलेले नाही.

२. माझ्या फिर्यादमधील सर्व मजकुर खरा व बरोबर आहे. आरोपीला रू.१५,००,०००/— मी हातउसणवार टप्प्याटप्प्याने दिले. मी सदर रक्कम आरोपीला किती टप्प्याने व कोणत्या तारखांना दिली हे मी सांगु शकत नाही. माझा व्यवसाय मोठा असल्यामुळे माझेकडे कामगार आहेत. रूपेश टिबडेवाल हा माझा साळा आहे. हे म्हणणे खरे नाही की, पवन चव्हाण हा माझा मित्र आहे. साक्षीदार सांगतो की, तो

माझेकडे कामाला आहे. पवन चव्हाण हा माझेकडे गेल्या ७—८ वर्षांपासुन कामाला आहे. योगेश पितांबरी माझ्या मित्राचा भाउ आहे.

३. हे म्हणणे खरे आहे की, मी आरोपीला पैसे कोणत्या तारखेला दिले हे मला आठवत नाही. मी बी.कॉम पर्यंत शिकलो आहे. हे म्हणणे खरे आहे की, धनादेश निशाणी २३ वरिल हस्ताक्षर माझे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, धनादेश निशाणी २३ मधील रक्कम मी लिहिली आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीने योगेश पितांबरी व पवन चव्हाण यांच्या खात्यामध्ये फोनपेने माझ्या म्हटल्याप्रमाणे पैसे टाकलेले आहेत. आरोपीने योगेश पितांबरी व पवन चव्हाण यांच्या खात्यात आजपर्यंत किती पैसे टाकले हे मला आता सांगता येणार नाही.

४. हे म्हणणे खरे नाही की, मला आयकर भरावे लागु नये म्हणुन मी सदरची रक्कम योगेश पितांबरी व पवन चव्हाण यांच्या खात्यात मागवत होतो. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने पवन चव्हाण याच्या खात्यात रू. ४,८२,०००/— टाकलेले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीने योगेश पितांबरी याच्या खात्यात रू.९५,०००/— टाकलेले आहेत.

५. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने मला दि. १४/१०/२०२१ रोजी राज हॉटेल, अकोट रोड येथे रू. २,५०,०००/— दिले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने मला दि. २२/१०/२०२१ रोजी रू.१,२०,०००/— दिले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने मला दि. ०२/०५/२०२२ रोजी रू.१,००,०००/— दिले आहेत. हे

म्हणणे खरे नाही की, आरोपीने मला दि. १६/११/२०२२ रोजी रू.३,७५,०००/— दिले आहेत.

६. मी नितीन खोंड, भागवत झाडोकार व रोहन गुप्ता यांना ओळखत नाही. हे म्हणणे खरे आहे की, दि. १६/११/२०२१ रोजी आरोपीने मला फोनपे द्वारे रू. ८,०००/— टाकलेले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, दि. ११/०६/२०२१ रोजी आरोपीने मला फोनपे द्वारे रू. ४,०००/— टाकलेले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, दि. १६/०६/२०२१ रोजी आरोपीने मला फोनपे द्वारे रू. ६,०००/— टाकलेले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, दि. ३१/०३/२०२३ रोजी आरोपीने मला फोनपे द्वारे रू. १५,०००/— टाकलेले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, दि. ०५/०५/२०२३ रोजी आरोपीने मला फोनपे द्वारे रू. १०,०००/— टाकलेले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, दि. ०९/०५/२०२३ रोजी आरोपीने मला फोनपेद्वारे रू. ४,०००/— टाकलेले आहेत. मी आरोपीला जवढे पैसे दिले तेवढे मला आले नाही म्हणुन सदर रकमा मला मिळाल्या ही बाब मी फिर्याद मध्ये नमुद केलेली नाही. आरोपीकडुन आजपर्यंत मला किती रूपये मिळाले याचा हिशोब मी केलेला नाही.

७. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीने मला दोन कोरे धनादेश दिले होते व एक मुद्रांक पेपर दिला होता. हे म्हणणे खरे आहे की, सदर धनादेश व मुद्रांक पेपर मला आरोपीने घेतलेल्या कर्जापोटी सुरक्षेसाठी दिलेला होता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने मला पुर्ण रक्कम परत केली आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीने मला सुरेक्षेपोटी दिलेला धनादेश व मुद्रांक पेपर मी त्याला परत केलेले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीकडुन जास्तीचे पैसे

उकळण्यासाठी मी त्याच्याविरूध्द खोटी केस केली आहे.
**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास — काही नाही.**

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत.

**स्वा/—**

दि. २२.०७.२०२६ (ए.ए. माळी)
अकोट न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्या.क्र. २) अकोट, जि. अकोला.